REGISTERED No. B. 3134




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटि... अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ७ जानेवारी १९४... अंक १

श्री —— श्री —— श्री —— श्री —— श्री

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

## युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री —— श्री —— श्री —— श्री —— श्री

## विविध माहिती

**चॉकोलेटची निर्यात**—हिंदुस्थान सरकारनें २० टन चॉकोलेट परदेशीं पाठविण्यास परवानगी देण्याचें ठरविलें आहे. निर्यातीच्या परवान्यासाठी अर्ज ता. ३१ जानेवारी, १९४८ पर्यंत अन्न-खात्याकडे करावयाचे आहेत. अर्जाबरोबरच ज्या देशांकडे माल निर्यात करावयाचा असेल तेथील व्यापाऱ्यांची मागणीही जोडावयाची आहे.

**अमेरिकेंत तिसरा राजकीय पक्ष**—अमेरिकेच्या अध्यक्षाच्या १९४८ सालीं होणाऱ्या निवडणुकीसाठी रिपाब्लिकन व डेमोक्रॅट ह्या दोन पक्षांव्यतिरिक्त तिसऱ्या पक्षातर्फे निवडणूक लढविली जाण्याचा संभव मि. हेन्री वॉलेस ह्यांनी व्यक्त केला. मि. वॉलेस हे स्वतःच अध्यक्षपदासाठी उभे रहाणार आहेत. प्रे. टूमन ह्यांच्या मंत्रिमंडळांतून परराष्ट्रीय धोरणासंबंधीं मतभेद झाल्यामुळें त्यांनीं १८ महिन्यांपूर्वी राजीनामा दिला होता. प्रे. रूझवेल्ट ह्यांचें धोरण पुढें चालविणारे म्हणून त्यांची अमेरिकेंत प्रसिद्धि आहे.

**कागदाच्या बचतीसाठी**—१९४८ च्या प्रारंभापासून मोफत पाठविण्यांत येणाऱ्या जाहिरातवजा पत्रकांचा आकार निम्यानें कमी करण्यांत आल्याचें ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडतर्फे जाहीर करण्यांत आलें आहे. कागदाची बचत करण्यासाठी हा नवा निर्बंध घालण्यांत आला आहे. नाट्य प्रयोगाच्या जाहिराती व फुटबॉलच्या सामन्यांत बैसे लावण्यासाठीं वापरण्यांत येणारे कागद ह्यांना मात्र वरील निर्बंध लागू नाहीं. त्यांच्या आकाराची कपात पूर्वीच झाली आहे.

**ग्रेट ब्रिटन-रशिया व्यापारवृद्धीचें पहिलें पाऊल**—ग्रेट ब्रिटन व रशिया ह्यांचेमधील व्यापारी करारावर मॉस्को येथें उभय पक्षाच्या गेल्या आठवड्यांत सह्या झाल्या. ह्या कराराप्रमाणें, रशिया ग्रेट ब्रिटनला ७½ लक्ष टन धान्य देणार आहे. त्याचे बदली ग्रेट ब्रिटन लाकूड कापण्याची व वहाण्याची यंत्रसामुग्री व विजेचीं यंत्रें देणार आहे. रशियाचें धान्य—बार्ली, मेझ व ओट—हें जनावरांस चारण्यास योग्य असून त्यामुळें ग्रेट ब्रिटनमधील दूध, मांस, अंडीं इत्यादींच्या उत्पादनास सहाय्य होईल. प्रस्तुत करार अल्प मुदतीचा आहे. दीर्घ मुदतीच्या कराराबाबत येत्या मे महिन्यांत पुनः बोलणीं होतील. ॲंग्लो-रशियन व्यापारवृद्धीची हा करार ही केवळ पहिलीच पायरी आहे, असें मानण्यांत येत आहेत.

**तेलाच्या घाण्यांस प्रोत्साहन — ५,०८० रु. चें बक्षिस**—इंडियन ऑइल सीडस कमिटीच्या "खेडेगांवीं तेलघाण्या" उपसमितीची बैठक नागपूर येथें नुकतीच भरली होती. "वर्धा" घाणीचा उपयोग करून व तेल्यांच्या सहकारी सोसायट्या काढून तेलाच्या घाणीचा धंदा सुधारावा असें कमिटीनें ठरविलें. एका घाण्यांत एका तासांत, एका बैलाच्या शक्तीनें १० शेर तेल गाळणारी घाणी करून देणाऱ्या संशोधकास ५,००० रुपयांचें बक्षिस देऊं केलें आहे. स्थानिक कच्च्या मालापासून साबण व केसास लावण्याचीं तेलें करण्याचें तेल्यांस व इतरांस शिक्षण देण्यासाठी नागपूर येथें एक मध्यवर्ती शिक्षण संस्था काढण्याचें ठरलें.

**कलकत्ता ट्राम्वेज कं. लि.**—वरील कंपनीची वार्षिक सभा लंडन येथें नुकतीच झाली. कंपनीच्या कामगारांमधील असंतोष, जातीय दंगे, इत्यादि कारणामुळें कंपनीचें उत्पन्न घटल्याकारणानें कंपनी डिव्हिडंड देऊं शकली नाहीं.

**ॲस्प्रो लि.**—वरील कंपनीनें ५०% डिव्हिडंड जाहीर केलें आहे. "[illegible]स्को" नांवाच्या पोटांत घेण्याच्या नव्या गोळ्या कंपनीनें आतां काढल्या असून त्यांच्या प्रसाराची योजना चालू आहे.

**पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स लि.**

वरील कंपनीस ३१ जुलै १९४७ अखेर संपलेल्या वर्षी २३,७१४ रु. घसारा काढून ९,३०६ रु. नफा उरला. त्यांतून विक्री केलेल्या सर्व ऑर्डिनरी भागांस १०% व क्यु. प्रेफरन्स भागांस ५% डिव्हिडंड देऊन उरलेली रक्कम पुढील वर्षाचे हिशेबांत ओढण्यांत आली.

कंपनीच्या इस्टेटीवरील उसाच्या लागवडीचें काम समाधानकारक रीतीनें चालू असून पिकेंहि उत्तम स्थितींत आहेत. गूळवहातुकीवरील जिल्हा बंदीमुळें मालाच्या वहातूक व विक्रीबाबत कंपनीस बऱ्याच अडचणी सोसाव्या लागल्या. येत्या मोसमांत केळींच्या बागेच्या लागणीचें काम कंपनी हातीं घेत असून सदर मालास मागणी सतत असून बाजारपेठाहि नजीक आहेत. "अधिक धान्य पिकवा" या सरकारी मोहिमेस प्रोत्साहन देणेसाठी रिपोर्टचे सालांत कंपनीनें मोठ्या प्रमाणावर शास्त्रोक्त पद्धतीनें धान्याचें उत्पादन केलें व चालू सालींहि तोच कार्यक्रम कंपनी पुढें चालविणार आहे. सर्व धान्याचीं पिकें उत्तम स्थितींत आहेत असें समजतें. वहातुकीसाठी व नांगरटीसाठी बैल व शेतकीचीं नांगर वगैरे अवजारें भाड्यानें मिळणें मुष्किलीचें झाल्यानें व वेळच्यावेळीं मेहनत मशागत होणें इष्ट असल्यानें, बैल, नांगर वगैरे अवजारें व गाड्या कंपनीनें स्वतःच विकत घेतल्या व यंदाहि घेणार आहे. उंसाचें क्षेत्र वृद्धिंगत करण्याचे दृष्टीनें पाणी खेचण्यासाठीं पंप वगैरे यंत्रसामुग्री वाढविण्याचा कंपनीचा विचार आहे. कंपनीच्या फॅक्टरींत व कामगारांच्या राहत्या जागांत विजेचा पुरवठा करण्याचें काम कंपनीनें हातीं घेतलें आहे. कुरोली येथें कंपनीच्या फॅक्टरीमध्यें कंपनीच्या विनंतीवरून सरकारनें पोस्ट ऑफिस सुरू केलें आहे. त्याचा उपयोग कंपनीच्या कामगारांना व कंपनीला चांगलाच होतो. उंसाचें क्षेत्र वाढविण्यासाठी आणखी जमिनी मिळवून देणेबद्दल मिरज (ज्यु.) दरबारकडे मागणी केली असून त्या लवकरच मिळतील अशी उमेद आहे.

श्री. आर. जी. भाडुले, बी. एससी., एलएल. बी., हे कंपनीचे चेअरमन असून मेसर्स जे. व्ही. ताम्हणकर आणि कं.कडे मॅनेजिंग एजन्सी आहे. कंपनीस मिरज (ज्यु.) संस्थानच्या दरबाराचें व राजेसाहेबांचें सक्रिय सहाय्य झालें आहे व होत आहे.


# कृष्णा शुगर मिल्स लि.

## कृष्णा-कित्तूर

## कन्फेक्शनरी सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

**६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.**

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्ट:—कृष्णा-कित्तूर
जिल्हा:—बेळगांव.

**विंचूरकर ॲण्ड को.**
मॅनेजिंग एजण्टस्.

# अर्थ

बुधवार, ता. ७ जानेवारी १९४८




प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## १९४७ साल हिंदी बँकांस कसें गेलें ?

गेल्या वर्षातील राजकीय स्थित्यंतरामुळें निर्माण झालेल्या तात्कालिक अनेक अडचणींतून हिंदी बँका शीरसलामत बाहेर पडल्या, असें सामान्यतः म्हणतां येईल. विदेशी एक्सचेंज बँका वगळल्या, तर हिंदी बँकिंगच्या धंद्यांत पहिल्यापासूनच बिगर-मुसलमानांचें प्राधान्य आहे. ज्या प्रांतांतून मुसलमानांचें संख्याधिक्य आहे, अशा ठिकाणींहि बँकिंगच्या धंद्यांत मुसलमान मागासलेले आहेत. पाकिस्तानांतील बँकांची मालकी व व्यवस्था ही मुसलमानेतरांकडेच होती. मुसलमानांच्या बँका असल्याच तर त्या लहान व थोड्या होत्या. फाळणीमुळें, पाकिस्तानांत व्यवहार करणाऱ्या हिंदी बँकांचें फारच नुकसान झालें आहे. कित्येक बँकांनीं संभाव्य आपत्तीची तरतूद म्हणून अगोदरच आपल्या मुख्य कचेऱ्या पश्चिम पंजाबांतून हालवून बाहेर आणल्या. अशा रीतीनें, पश्चिम पंजाबांतील २९ बँकांपैकी २७ बँकांनीं दक्षता घेतली. तथापि, आपला सर्व व्यवहार गुंडाळणें त्यांस अर्थातच शक्य नव्हतें. हिंदुस्थानांत मुख्य कचेऱ्या असलेल्या व पाकिस्तानांत व्यवहार करणाऱ्या हिंदी बँकांनीं पंजाबमधील दंगलीचा धक्का उत्कृष्टपणें सोसला व त्यांच्या हिंदुस्थानांतील कचेऱ्यांस अडचणी भोगाव्या लागल्या नाहींत, ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. पाकिस्तानांतील कचेऱ्यांमधील कागदपत्र अद्याप उपलब्ध न झाल्यामुळें, नुकसानीचा पक्का अंदाज आज करतां येणें शक्य नाहीं. पाकिस्तानांतील हिंदू बँकांचे व्यवहार स्थगित झाले असले तरी तेथील ब्रिटिश एक्सचेंज बँकांस मात्र व्यवहार वाढविण्यास आतां नामी संधी निर्माण झाली आहे.

फाळणीमुळें वरीलप्रमाणें हिंदी बँकिंगवर आघात झाला असला तरी बँकिंगच्या धंद्याचा संसार, आर्थिक परिस्थितीचा विचार करतां, साधारणपणें यशस्वी झाला असेंच म्हटलें पाहिजे. बँकांकडील ठेवींमधील वाढीची गति मंदावणें स्वाभाविकच होतें. वर्षाचे पहिल्या सहामाहींत बँकांनीं कर्जें सढळ हातानें दिलीं, परंतु वर्षअखेर तीं आखडतीं घेतलीं. रोकड रकम मोठ्या प्रमाणावर बाळगण्याची प्रवृत्ति वाढत चालली. व्यवस्था खर्च वाढला तरी कर्जावरील व्याजाचे दरहि वाढले आणि त्यामुळें बँकांच्या नफ्याचे आकड्यावर फारसा प्रतिकूल परिणाम होण्याचें कारण नाहीं. हिंदी बँकांच्या ठेवींमध्यें १९४३ सालीं २१२ कोटी रुपयांची वाढ झाली; १९४४ सालीं १६१ कोटी रुपयांनीं ठेवी वाढल्या; १९४५ सालांतील वाढ १३४ कोटी रुपयांची झाली; १९४६ सालांतील वाढीची रकम ११६ कोटी रुपये होती आणि १९४७ सालीं फक्त ८½ कोटी रुपयांनीं ठेवी वाढल्या. ठेवींच्या वाढीच्या रकमेंत सालोसाल घट दिसून येण्याचें कारण लोकांच्या बचतीमधील वाढ खुंटत चालली आहे, हें होय. लोकांच्या नोकऱ्या सुटत चालल्या, नोकरीवर असणाऱ्या कित्येकांचे पगार कमी झाले, व्यवसायांचे नफे उतरले आणि करांचें प्रमाण वाढलें. महाराष्ट्रीय बँकांपुरतें पाहिलें, तर मध्यमवर्गीयांस किंमत-वाढीचा व राहाणीच्या खर्चाच्या वाढीचा ताण आतां असह्य झाल्यामुळें त्यांच्या बचतीमुळें निर्माण होणाऱ्या ठेवी आतां फारच कमी झाल्या आहेत. बँकेकडे पैशाची मागणी भरपूर प्रमाणांत येत राहिली, त्यास मालाच्या किंमतीमधील वाढ हें एक प्रमुख कारण आहे. पूर्वी इतकाच व्यवहार करण्यास पैसा मात्र पूर्वीपेक्षा अधिक लागू लागला. बँकांनीं १९४७ च्या दुसऱ्या सहामाहींत कर्जें देण्यांत फारच सावधगिरी दाखविण्यास प्रारंभ करून, २९ ऑगस्ट, १९४७ रोजीं १६१ कोटी रुपये आपल्या तिजोऱ्यांत व रिझर्व्ह बँकेकडे रोख बाळगले ! त्या दिवशीं, बँकांच्या रोखीचें प्रमाण १५·६१% इतकें झालें. वर्षाचे अखेरीस हें प्रमाण थोडें उतरलें असलें, तरी एक वर्षापूर्वीचे मानानें (११%) तें अद्याप पुष्कळच ज्यास्त आहे.

गेल्या वर्षी, बँकांच्या संख्येंत फारच थोडी भर पडली आणि शाखा वाढीची प्रवृत्तीहि पण मंदावली, हें खालील तक्ता दर्शवितो:—

शेड्यूल्ड बँकांच्या एकूण कचेऱ्या

| | ३०–९–४६ | ३१–३–४७ | ३०–९–४७ |
|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ४३८ | ४४६ | ४४४ |
| पांच प्रमुख बँका | ७१२ | ७८३ | ७७९ |
| एक्सचेंज बँका | ८७ | ८८ | ८० |
| इतर शेड्यूल्ड बँका | २,०७१ | २,२५९ | २,२२३ |
| | ३,३०८ | ३,५७६ | ३,५२६ |

आतां बँकांना नवीन शाखा उघडावयाची असल्यास किंवा शाखेचें स्थलांतर करावयाचें असल्यास रिझर्व्ह बँकेची आगाऊ परवानगी घ्यावी लागते. जून १९४७ अखेर १४३ नव्या शाखांसाठीं रिझर्व्ह बँकेकडे अर्ज गेले त्यांपैकी फक्त ८५ शाखांसच परवानगी मिळाली. ३१–३–४७ ते ३०–९–४७ ह्या सहामाहींत, शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांच्या संख्येंत ५० ची घट झालेली आहे.

बँकांच्या जाहिराती आतां नव्या शाखांचे उद्घाटनावर व ठेवींतील वाढीवर का भर देत नाहींत व आपल्या अधिकृत, खपलेल्या व वसूल झालेल्या भांडवलाचे आकड्यांस का प्राधान्य देत आहेत, हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. बँकांनीं आपले पैसे अधिक किफायतशीरपणें गुंतवून, थोड्या व्यवहारांत ज्यास्त नफा मिळविण्याचें धोरण स्वीकारलें आहे आणि मुंबई सरकारी नियंत्रणाचा कायदा बँकांकडील कर्ज मागणी वाढण्यास पोषकच झाला आहे. अशा रीतीनें बँकांच्या किफायतशीरपणास, ठेवी कमी होऊन व रोख रकमेचें प्रमाण वाढूनहि, बाध येण्याचा तात्काळ तरी संभव नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत, बँकांनीं आपलें शेअर भांडवल व रिझर्व्ह ह्यांत भर टाकून आपली मजबुती वाढविलेली आहे. वाढलेल्या शेअर भांडवलावरील डिव्हिडंडचा दर कसा टिकेल हें लवकरच दिसून येईल.

**अमेरिका–इराण करार**—इराण व अमेरिका ह्यांचेमधील नव्या करारामुळें इराण हा ग्रीस व तुर्कस्तानप्रमाणें अमेरिकेचा दास बनला आहे, अशी टीका मॉस्को रेडिओनें केली आहे. इतर देशांच्या अंतर्गत कारभारांत अमेरिका कसा हात घालते, ह्याचा प्रस्तुत उदाहरण हा उत्कृष्ट नमुना आहे, असेंहि सांगण्यांत आलें.

# शेअर्सच्या किंमतीमधील आंदोलनें

शेअर बाजारांत पैसे गुंतविणारांच्या दृष्टीनें १९४७ सालाइतकें वाईट वर्ष कधींच गेलें नसेल. वर्षअखेर भाव थोडे सुधारले असले तरी त्यापूर्वी कांहीं महिने झालेल्या घसरगुंडीच्या मानानें ही सुधारणा कांहींच नव्हे. खालील तक्त्यावरून मुंबई शेअर बाजारांतील आंदोलनांची कल्पना येईल.

### तुलनात्मक आढावा

| | १९३८ (युद्धपूर्व) | | १९४५ | | १९४६ | | १९४७ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान |
| | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) | (रु.) |
| टाटा डिफर्ड | १,५६० | ८१७½ | २,६७५ | १,९८० | ३,६१७½ | २,५१२½ | २,८५७½ | १,५६० |
| टाटा ऑर्डिनरी | ३२४ | २०१ | ४८० | ३७२ | ६३८ | ४६० | ५१३ | ३२२ |
| बॉंबे डाइंग | १,०११¼ | ७६५ | २,२२१¼ | १,७६३¾ | ३,२७७½ | २,१०० | ३,१२२½ | ९२५ |
| कोहिनूर | ३५६⅞ | २४२½ | ७०२ | ५६६ | १,१८० | ६५४ | ९३९ | ५१६ |
| स्वदेशी | २६५ | १७५ | ६६९ | ५०७ | ९९५ | ६६१ | ८४५ | ५०७ |
| गोकाक | १९६¼ | १३६¼ | ३३५ | २८३½ | ५७१ | ३१७ | ३८२ | २८० |
| असो. सिमेंट | १४३½ | १०३ | २५८¾ | २०४¾ | २७७ | २२५ | २३० | १५० |
| बलापूर | १९२½ | १४० | २५६ | २११ | ३७५ | २४० | ३६३ | २२६ |
| बॅंक ऑफ इंडिया | १५० | १३६ | २३२ | १८१½ | २९५ | १९६ | २७२ | २१२ |
| रिझर्व्ह बॅंक | १२५¾ | १०७½ | १६९ | १३० | १८०½ | १४८ | १५० | ११४ |
| न्यू इंडिया | ४२ | ३४½ | ९८ | ७६ | १३५½ | ९३ | ११५ | ६९ |

## महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद्

### सहकारी संस्थांस विनंती

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें, महाराष्ट्र विभाग सहकारी स्कूलबोर्डाचे मार्फत, जानेवारी १९४८ मध्यें पुणें येथें महाराष्ट्र विभाग परिषद् भरविण्याचें ठरविलें आहे. महाराष्ट्र विभाग परिषद् अलीकडे बरेच वर्षांत झाली नाहीं. देशांतील राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळें सहकारी चळवळीच्या दृष्टीनें अनेक महत्त्वाचे प्रश्न उत्पन्न झाले आहेत व अशा प्रश्नांचा काळजी-पूर्वक विचार करून सहकारी चळवळीचे पुढील कार्यक्रमासंबंधीं विचार करणें अगत्याचें झालें असल्यानें ही परिषद् बोलविण्याचें ठरलें आहे. प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे.

परिषद् यशस्वी करण्याचे दृष्टीनें सर्व सहकारी संस्थांचें सहकार्य व सहानुभूती आवश्यक आहे. तेव्हां त्यांनीं परिषदेस शक्य तेवढें आर्थिक साहाय्य देणगीचे रूपानें शक्य तितक्या लवकर खालील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

**य. द. खोले**
अध्यक्ष,
महाराष्ट्र विभाग सहकारी स्कूलबोर्ड
५ बयरामजी जिजीभाई रोड, पुणें १.

**रेल्वे अधिकाऱ्यांस शासन**—रेल्वे वॅगन्स आवश्यक त्या गतीनें फिरत्या न ठेवल्याबद्दल रशियांतील कित्येक रेल्वे अधिकाऱ्यांना कैदेची शिक्षा देण्यांत आली, असें मॉस्को रेडिओचें वृत्त आहे.

## हिंदुस्थानांतील कापड गिरण्या

| | ३१ ऑगस्ट अखेरचें वर्ष | |
|---|---|---|
| | १९४६ | १९४७ |
| एकूण गिरण्या | ४२१ | ४२३ |
| गिरण्यांतील एकूण माग | २,०२,८१४ | २,०२,६६२ |
| त्यापैकीं चालू माग | १,८६,५०५ | १,८४,७९० |
| गिरण्यांचें वसूल भांडवल (रु.) | ५६ को. १८ ल. | ६३ को. १२ ल. |
| बसविलेल्या एकूण चात्या | १,०३,०५,१६९ | १,०३,५१,९७३ |
| एकूण चालू चात्या | ९५,४८,२९५ | ९५,८४,२५७ |
| गिरण्यांत खपलेली कपास (खंडी) | २२,७४,९६६ | १९,८६,०७८ |
| दिवस पाळीवरील कामगार | ४,९५,४५६ | ४,८८,३७० |

गिरण्यांची संख्या एका वर्षांत दोहोनें वाढली, त्यांतील मागांची संख्या उतरली, वसूल भांडवल वाढलें, चात्यांच्या संख्येंत वाढ झाली, कपाशीचा उठाव कमी झाला व कामगारहि कमी कामावर होते, असा वरील तक्ता दर्शवितो.

**राष्ट्रीय काटकसर**—फ्रान्समध्यें १९४८ सालीं मजुरीचे दर वाढविले जाणार नाहींत व सरकारी नोकरींतून १,५०,००० नोकर कमी केले जातील, असें फ्रेंच पंतप्रधान मि. शूमन ह्यांनीं जाहीर केलें.

**निर्वासित व विमा कंपन्या**—निर्वासित विमेदारांना विमा कंपन्यांनीं सहानुभूतीनें वागवावें व त्यांस शक्य तेवढ्या सवलती याव्या, अशी हिंदुस्थान सरकारनें सर्व आयुर्विमा कंपन्यांना विनंति केली आहे.

## मध्यप्रांत व वऱ्हाड ह्यांतील रहात्या घरांचा प्रश्न

### मध्यम वर्गीयांची अडचण दूर कशी होईल ?

लेखक:—श्री. जी. ए. भोंसुले, बी. कॉम; चेअरमन,
दि सी. पी. अँड बेरार प्रीमिअर को. हाउसिंग
सोसायटी लि., नागपूर.

( १ )

ह्या प्रांतांतील सर्वच लहान-मोठ्या शहरांत इतर प्रांतांप्रमाणेंच रहाणीस योग्य घरें मिळण्याचा प्रश्न फारच बिकट होऊन गेलेला आहे. सध्याचा काळच मामुली स्वरूपाचा नसल्याकारणानें हा प्रश्न सरकार, म्युनिसिपालिट्या, इंप्रुव्हमेंट ट्रस्टस् आणि श्रीमंत लोक ह्यांच्या सहानुभूतीशिवाय व सहायाशिवाय सुटणें अशक्य आहे. लिमिटेड कंपन्या व वैयक्तिक भांडवलदार घरें बांधण्यांत पुढाकार घेऊं शकले तरी त्यांचा मुख्य उद्देश नफा मिळविण्याचा असल्याकारणानें, ते स्वस्त घरें उपलब्ध करून देऊं शकणार नाहींत. मध्यम व कनिष्ठ वर्गाची घरांची मागणी चांगल्या प्रकारें योजलेल्या व चालविलेल्या सहकारी सोसायट्याच पुरी पाडूं शकतील. परंतु त्यांस सरकार, म्युनिसिपालिट्या व इंप्रुव्हमेंट ट्रस्टस ह्यांचेकडून प्रत्यक्ष मदत व वाजवी दरानें घर बांधण्याचें सामान हीं मिळालीं पाहिजेत व तज्ज्ञ सल्लाहि पण मिळाला पाहिजे. १९३०चे पूर्वींचीं कांहीं वर्षें मंदीचीं होती आणि त्यावेळीं बांधकामाचें सामान व मजुरी हीं अत्यंत स्वस्त होती. योग्य नियोजन व मार्गदर्शन ह्यांचे अभावीं त्यावेळीं गृहमंडळ्या निघाल्या नाहींत. त्या निघाल्या असत्या तर आजचा घरांचा तुटवडा भासला नसता. नियोजनाच्या अभावीं जीं घरें बांधलीं गेलीं, तीं गैरशिस्तपणें ठिकठिकाणीं उभीं राहिलीं.

श्रीमंत लोक किंवा कारखानदारांचे, सरकारचे व म्युनिसिपॅलिट्यांचे गरीब नोकर ह्यांच्या बिऱ्हाडांच्या सोईचा विचार येथें केलेला नाहीं. बांधकामाच्या मालाची किंमत कितीहि भरमसाट असली तरी ती देऊन श्रीमंत लोक घरें बांधूं शकतात. शिवाय, आज त्यांस घरांची तशी अडचण भासत नाहीं. मजूर व गरीब लोक ह्यांच्या रहात्या घरांचा प्रश्न सरकार, कारखानदार, म्युनिसिपॅलिट्या, इत्यादींनींच सोडविला पाहिजे.

#### चार प्रमुख बाबी

घरें बांधण्याच्या प्रश्नाचा विचार करतेवेळीं चार प्रमुख बाबींचा विचार केला पाहिजे. (१) जमीन, (२) मजूर, (३) भांडवल व (४) बांधकामाचें सामान. ह्यांपैकी मोठ्या शहरांतील व गांवांतील जमिनी अक्वायर करण्यास अडचण पडूं नये. उदाहरणार्थ, नागपूरमध्यें सरकारी व खाजगी मालकीची कितीतरी जागा आज पडून आहे. सरकार व म्युनिसिपॅलिट्या हीं हाउसिंग सोसायट्यांना आपली जमीन स्वस्त दरानें विकूं शकतील आणि लोकांच्या जागा सरकारी मदतीनें अक्वायर करतां येतील. सध्याची जमीनीची किंमत बरीच असली तरी ती भरमसाट नाहीं. मध्यम वर्गीयांसाठी जमीन द्यावयाची ती बाजारपेठांतील महाग जागा घेण्याचें कारण नाहीं. योग्य दरानें जमीनीचे मोठाले तुकडे बहुतेक सर्व शहरांतून व गांवांतून मिळूं शकतील. ह्या जमीनींसंबंधीं महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांसाठी सिमेंट, लोखंड, लाकडी, दगड, इत्यादि स्वस्त दरानें पुरवून व इंजिनिअरांच्या विनामूल्य सल्ल्याचा फायदा मिळवून देऊन सरकारनें जमिनींची सुधारणा करण्यासाठी सोसायट्यांना मनःपूर्वक सहाय दिलें पाहिजे.

वरील प्रकारें सरकारनें मदत केल्यास, ४ आणे चौरस फुटापर्यंत सोसायट्यांना प्लॉट्स विकतां येतील. ज्यां जमीनी सुधारून त्यांचें प्लॉट्समध्यें रूपांतर झालेलें आहे, अशा प्लॉट्सच्या मालकी हक्कांचीच विक्री व्हावी; ते खंडानें देण्यांत येऊं नयेत. इतर प्लॉट्सबाबत त्यांच्या किंमतीच्या १% इतका वार्षिक खंड आकारण्यास हरकत नाहीं. सुरवातीस, सुमारें ५० एकरांचें क्षेत्र, खाली सांगितल्याप्रमाणें प्लॉटसच्या योग्य करून सोसायट्यांस द्यावें. त्यांत अर्थातच बागा, क्रीडांगणें, शाळा, बाजार, क्लब, वाचनालयें, दुकानें, इत्यादींकरितां जागा राखून ठेवावी.

मजुरीबाबत प्रश्न सोडविणें जरा बिकटच दिसतें. सध्याच्या महागाईच्या आणि तुटींच्या दिवसांत मजुरांस कमी मजुरी स्वीकारण्यास सांगतां येणें अशक्य आहे. त्याचप्रमाणें, सुतार व गवंडी ह्यांनांहि कमी रोजगारावर काम करण्यास लावतां येणार नाहीं. बाजारभावानेंच त्यांस वेतन दिलें पाहिजे.

#### भांडवलाचा पुरवठा

भांडवलाचा विचार करतां, तें अल्प व्याजाच्या दरानें मिळवतां येण्याजोगें आहे. चांगल्या तऱ्हेनें चालविल्या जाणाऱ्या हाउसिंग सोसायटीस आवश्यक तें भांडवल ठेवींच्या व डिबेंचरांच्या रूपानें जमा करणें साधारणतः अवघड जाऊं नये. परंतु, त्यास सरकारी मदतीची मात्र आवश्यकता आहे. ठेवी व डिबेंचर्स ह्यांचें मूळ भांडवल व त्यांवरील व्याज ह्यांची हमी घेण्यास सरकारनें पुढें यावें. वरीलप्रमाणें सरकारची पूर्ण गॅरंटी असल्यास, ३% पेक्षां अधिक दर न देतां भांडवल मिळणें अगदीं शक्य आहे. सोसायट्यांना, व्यवस्था खर्च भागविण्यासाठी, वाजवी दरानें डिव्हिडंड देण्यासाठीं व रिझर्व्ह निर्माण करण्यासाठीं १½% ची तरतूद जरूर पाहिजे.

हाउसिंग सोसायट्यांच्या शेअर्सवरील डिव्हिडंडचा दर ४% पेक्षां अधिक असण्याची कांहीं जरूरी नाहीं, कारण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सरकारी सहायामुळें व सोसायट्यांचें डिव्हिडंड करमाफ असल्यामुळें सोसायट्यांचे शेअर्स पुष्कळच लोकप्रिय होतील. ह्या सोसायट्यांना भांडवल पुरविण्यांत विमा कंपन्या बराच महत्त्वाचा भाग घेऊं शकतील. विमा कायद्याप्रमाणें विमा कंपन्यांना आपल्या जिंदगीच्या कांहीं ठराविक किमानं (५५%) भाग सरकारी व तत्सम रोख्यांत गुंतवावाच लागतो. सहकारी हाउसिंग सोसायट्यांना वाजवी दरानें देतां येईल असा मुबलक पैसा त्यांचेजवळ असतो. हिंदुस्थानांतील एक प्रमुख सहकारी कार्यकर्ते, दि. ब. हिरालाल एल. काजी, ह्यांनीं एका विमा कंपनीच्या वार्षिक सभेचे अध्यक्षपदावरून भाषण करतांना, विमा कंपन्यांचेसाठींच केवळ म्हणून हिंदुस्थान सरकारनें २½% करमाफ व्याजाचें एक कर्ज उभारावें अशी सूचना केली. सर्वसाधारण जनतेवर भार टाकून एकाद्या विवक्षित वर्गासच प्राधान्य देऊन मदत करणें सरकारास योग्य होणार नाहीं. परंतु विमा कंपन्या, म्युनिसिपॅलिट्या, जिल्हा लोकलबोर्ड, पोर्ट ट्रस्टस, ह्या सारख्या संस्थांस आपले पैसे आर्थिक दृष्ट्या भक्कम असलेल्या व व्यवस्थितपणें चालविण्यांत येणाऱ्या हाउसिंग सोसायट्यांकडे १५ ते २५ वर्षें मुदतीनें ठेवण्यास हरकत नाहीं. मुद्दल व व्याज ह्या दोन्हींसहि सरकारची गॅरंटी असल्यावर, हाउसिंग सोसायट्यांना २½% ते ३% नें भरपूर पैसा मिळणें सहज शक्य होईल. सरकारला आज बाजारांत २¾% नें २० ते २५ वर्षांचीं कर्जें मिळूं शकतात, त्यापेक्षां ½% ज्यास्त दर सरकारनें सोसायट्यांकडून घेऊं नये. परंतु, हिंदुस्थान सरकारचीं कर्जें ५० ते १०० लक्ष रुपयांसारख्या मोठ्या रकमांचीं उभारलीं जातात व लहान कर्जें उभारण्याचें काम रिझर्व्ह बँक कदाचित् अंगावर घेणार नाहीं. म्हणून सरकारी गॅरंटीच्या ठेवी व डिबेंचर्स हाच मार्ग शिल्लक रहातो.

म्युनिसिपॅलिट्या, जिल्हा बोर्डें, पोर्ट व इंप्रूव्हमेंट-ट्रस्टस्, इत्यादींच्या नोकरवर्गाच्या प्रॉव्हिडंट फंडांची रकम हाउसिंग सोसायट्यांत दीर्घ मुदतीनें गुंतवितां येण्याजोगी आहे प्रॉव्हिडंट फंडाची रकम विश्वस्त रकमेप्रमाणें समजली जाते. हाउसिंग सोसायट्यांजवळ किंमतवान जिंदगी असते व तिची रकम सहज उभारतां येणें शक्य असते. म्हणून, सरकारी व निमसरकारी रोखे आणि मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकांचीं डिबेंचर्स, ह्यांप्रमाणें हाउसिंग सोसायट्यांकडील ठेवींतहि प्रॉव्हिडंट फंडांतील पैसा गुंतविण्यास सरकारनें मान्यता द्यावी. अशा फंडाचा फारच अल्प भाग नोकरवर्गास देण्यासाठी दरसाल काढावा लागतो; तेव्हां ह्या संस्थांनीं आपल्या जवळील प्रॉव्हिडंट फंडांतील मोठा भाग दीर्घ मुदतीनें गुंतविण्यास कांहींच हरकत नाहीं. सहकारी हाउसिंग सोसायट्यांच्या शेअर्सवरील किमान डिव्हिडंडची-३% ची-गॅरंटी घेऊनहि सरकार ह्या सोसायट्यांस सहाय करूं शकेल. अशा गॅरंटीचे शेअर्स पैसे गुंतविणारांत लोकप्रिय होतील, हें सांगावयास नकोच.

## विमा कंपन्या, पो. से. बँक खातीं, इत्यादि बाबत हिंदुस्थान—पाकिस्तान करार

**विमा कंपन्या**—ज्या विमा कंपन्यांनीं आपल्या मुख्य कचेऱ्या पाकिस्तानांतून हिंदुस्थानांत हलविल्या असतील, त्यांनीं हिंदुस्थान सरकारामार्फत रिझर्व्ह बँकेस कळवावें, कीं त्यांनीं रिझर्व्ह बँकेकडे ठेवलेल्या स्टॅच्युटरी डिपॉझिटपैकीं १५% डिपॉझिट सध्या पाकिस्तानांत असलेल्या विमेदारांसाठी तूर्त राखून ठेवलें आहे. पाकिस्तानांतील विमेदारांच्या विम्याबाबत कंपन्यांची जोखीम किती आहे, ह्याचें पक्कें प्रमाण सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें ११ जानेवारी १९४८ पूर्वी निश्चित करावयाचें आहे. हिंदुस्थानांत आलेल्या कंपन्यांनीं ज्यामुळें पाकिस्तानी विमेदारांचें नुकसान होईल अशा रीतीनें पाकिस्तानांतून आपली जिंदगी हलवितां कामा नये. विमा, विशेषतः जनरल इन्शुअरन्स, कंपन्यांचे प्रतिनिधी क्लेमसंबंधीं चौकशीला जातील तेव्हां त्यांना आवश्यक तें संरक्षण दिलें जाईल. हिंदुस्थान सरकारहि तसेंच करील. हिंदुस्थानांतील कंपन्यांनीं पाकिस्तानांत चौकशीसाठी शक्य तोंवर मुसलमान प्रतिनिधी पाठवावे व पाकिस्तानी कंपन्यांनीं हिंदुस्थानांत हिंदू किंवा शीख प्रतिनिधी धाडावे, म्हणजे संरक्षणाचा प्रश्न सोपा होईल.

**सेव्हिंग्ज बँकांतील ठेवी:**—पाकिस्तानांतील लोकांनीं आपलीं पासबुकें तेथील पोस्ट ऑफिसांत द्यावींत. पाकिस्तानच्या पोस्ट खात्याच्या प्रमुखानें ती एकत्र करून हिंदी पोस्ट खात्याच्या प्रमुखाकडे यादी धाडावी, म्हणजे तो खाती हिंदुस्थानांत वर्ग करवून घेण्याची व्यवस्था करील; ज्यांचीं पासबुकें नसतील, त्यांनी आपलें खातें ज्या पोस्ट ऑफिसांत असेल त्याची माहिती पुरवावी. ती एकत्र करून दोन्ही देशांच्या पोस्ट खात्यांचे प्रमुख एकमेकांकडे पाठवितील आणि आवश्यक त्या चौकशा करून खातीं वर्ग करवून घेतील.

**पो. ऑफिस सर्टिफिकेटें:**—पो. ऑ. कॅश सर्टिफिकेटें, त्याचप्रमाणें सेव्हिंग्ज, नॅशनल सर्टिफिकेट ह्या संबंधातहि वरील प्रमाणेंच व्यवस्था केली जाईल.

**सहकारी सोसायट्या, बँका व युनियन्सकडील ठेवी:**—ह्या ठेवी व त्यांनीं दिलेलीं कर्जें हा अत्यंत किचकट विषय आहे. तेव्हां, पूर्व आणि पश्चिम बंगालच्या रजिस्ट्रारांनीं चर्चा करून स्वतःच्या सरकारांकडे आपल्या दोघांच्या संयुक्त सूचना २० जानेवारीपूर्वी पाठवाव्या.

## "औद्योगीकरणाची आरोळी चुकीची आहे"

### प्रो. कुमारप्पा ह्यांचा शेतीवर भर

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाचे प्रमुख कार्यकर्ते, प्रो. कुमारप्पा, ह्यांनीं आपल्या मद्रासमधील एका ताज्या भाषणांत, हिंदी आर्थिक धोरणाचें सूत्र शेती सुधारणा हें असावें; कारखानदारी हें नसावें, असें प्रतिपादन केलें. ते म्हणाले, "पेरा अगर नष्ट व्हा; ह्या दृष्टीनें आपण धोरण आखलें पाहिजे." "औद्योगीकरण करा अथवा नष्ट व्हा," ही आरोळी चुकीची आहे. विकेंद्रीकरणाच्या पद्धतीनें अन्न, कापड, आडोसा व प्राथमिक गरजेच्या जिनसा ह्यांचें उत्पादन वाढविण्यावरच आपण भर दिला पाहिजे. असें उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांस पोषक होतील, एवढेच मोठे कारखाने असले म्हणजे पुरे. तेहि सरकारनें नफेबाजी न करतां सेवावृत्तीनें चालवावे. जादा उत्पादन व चैनीच्या गोष्टी एवढ्यापुरताच परराष्ट्रीय व्यापार मर्यादित असावा. हीच महात्मा गांधींची स्वयंपूर्णतेची योजना. लोकहितासाठी सरकार काम करूं लागलें असलें, तरी आर्थिक बाबींत प्राधान्य मिळेपर्यंत स्वातंत्र्याचीं फळें आपणांस चाखावयास मिळणार नाहींत. सध्यांच्या पद्धतींत लष्करी, फडणिशी व परराष्ट्रीय खात्यांस अवास्तव महत्त्व मिळतें; हिंदुस्थानासारख्या शेतकीप्रधान देशांत, ह्या खात्यांस अगदीं दुय्यम दर्जा दिला पाहिजे."

### सहकारी चळवळीचा प्रतिस्पर्धी?

३४ व्या म्हैसूर प्रांतिक सहकारी परिषदेचें उद्घाटन करतेवेळीं, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे डेप्युटि गव्हर्नर मि. मेकी, ह्यांनीं स्वतंत्र भारतांतील सहकारी चळवळीच्या उज्ज्वल भवितव्याचें विवेचन केलें. स्वातंत्र्याचा परिणाम आर्थिक परिस्थिति सुधारण्याच्या प्रयत्नांत होणें स्वाभाविकच आहे आणि त्यांमध्यें सहकारी संघटनेस महत्त्वाचें स्थान आहे, असें सांगून त्यांनीं सरय्या कमिटीच्या महत्त्वाच्या शिफारशींचा उल्लेख केला आणि सर्वच प्रकारच्या सोसायट्यांच्या स्थापनेचें महत्त्व प्रतिपादन केलें. शेतकऱ्यांस भांडवल पुरविण्याच्या प्रश्नाचा विचार करणाऱ्या गाडगीळ कमिटीच्या रिपोर्टानें, सरकारी सहायानें व नियंत्रणानें चालणाऱ्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशनची शिफारस केली आहे. ही कॉर्पोरेशन सहकारी चळवळीस बाधक होण्याचें कारण नाहीं, आणि कालांतरानें सहकारी चळवळच शेतकऱ्यांस भांडवल पुरवणारी अग्रगण्य साधन बनेल, असें मत मि. मेकी ह्यांनीं व्यक्त केलें.

### मुंबई सहकारी मंडळ्यांचा कायदा

(ले:—श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, सातारा. किं. ४ रु. प्रां.सहकारी इन्स्टिट्यूट मुंबई.) सन १९२५ च्या मुंबईच्या ७ व्या कायद्याचें सन १९४४ जानेवारीपर्यंतच्या दुरुस्त्यांसह हें मराठींत सुलभ भाषांतर आहे. त्यांत साल कायद्याखालील नियमांचेंही भाषांतर देण्यांत आलें आहे. शिवाय प्रत्येक, कलमाखाली उपयुक्त अशा टिपाही लेखकानें दिल्या आहेत. एवंच, मराठींतून हा विषय शिकवतांना पाठ्य पुस्तक म्हणून व सहकारी चळवळींत भाग घेणाऱ्या केवळ मराठी जाणणाऱ्या व्यक्तींस उपयुक्त माहिती देणारें पुस्तक म्हणून, असा त्याचा दुहेरी उपयोग होणार आहे. याप्रमाणें प्रां. स. इन्स्टिट्यूटनें हें पुस्तक श्री. गजेंद्रगडकर यांचेकडून लिहवून घेऊन तें प्रसिद्ध केल्यामुळें महाराष्ट्रांतील सहकारी कार्यकर्त्यांची सोय झाली आहे. ह्याबद्दल दोघेही स्तुतीस पात्र आहेत.

म. धों. विद्वांस
एम. ए., एलएल. बी.

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इं. कं. लि.

### १९४६ चा अहवाल

वरील कंपनीच्या आगीच्या विमा खात्यास हप्त्याचें उत्पन्न २०,७२,०१८ रु. झालें; १९४५ सालीं तें १७,५८,६४४ रु. होतें. दिलेल्या व द्यावयाच्या नुकसानभरपाईची रकम ७,३४,-६८४ रु. भरली. प्रीमिअमच्या उत्पन्नाशीं तिचें प्रमाण ३५·४६% पडलें. व्याज, व्यवस्थाखर्च, चालू जोखमीसाठीं रिझर्व्ह (४०%) व २,०७,२०२ रुपयांचा आणखी रिझर्व्ह ह्या सर्वांची तरतूद करून उरलेले १,८२,६८६ रु. नफा–तोटा खातीं घेण्यांत आले. आग फंडाची रकम आतां १०,३६,००९ रु. (५०·००%) झाली आहे.

मरीन खात्याचें हप्त्याचें निवळ उत्पन्न २,१९,९९२ रु. भरलें; १९४५ सालीं तें १,८६,३९१ रु. होतें. नुकसान–भरपाईची रकम १,०५,१९६ रु. (४७·८३%) झाली. व्याज, व्यवस्था खर्च, चालू जोखमीसाठी रिझर्व्ह (४०%) व १,३१,९९५ रुपयांचा आणखी रिझर्व्ह ह्या सर्वांची तरतूद करून १७,०८९ रु. नफा-तोटा खातीं वर्ग करण्यांत आले. ह्या खात्याचा फंड आतां २,१९,९९२ रु. (१००%) झाला आहे.

अपघात व जनरल खात्यास प्रीमिअमचे १५,५७,८२५ रु. म्हणजे, पूर्वीच्या वर्षीपेक्षां सुमारें ५ लक्ष रु. अधिक मिळाले. नुकसानभरपाईची रकम ४,६९,४८५ रु. (३०·१४%) भरली. व्याज, व्यवस्था खर्च, चालू जोखमीसाठी रिझर्व्ह (४०%) व १,५५,७८२ रु. चा आणखी रिझर्व्ह ह्यांची तरतूद केल्यावर-उरलेले ९३,८३४ रु. नफा–तोटा खातीं घेण्यांत आले. ह्या खात्याच्या फंडांत आतां ७,७८,९१२ रु. (५०%) आहेत.

१ जानेवारी, १९४६ रोजीं विमा कंपनीकडे १ कोटी, १४ लक्ष रुपयांचे आयुर्विमे चालू होते. १९४६ अखेर १ कोटी, १० लक्ष रुपयांचे आयुर्विमे चालू आहेत. कंपनीस प्रीमियमचें उत्पन्न ५,७७,८५८ रु. झालें. व्याजाचा दर ३·०२% पडला. विमाखातीं फंड ४९¼ लक्ष रुपये झाला.

कंपनीच्या नफा-तोटापत्रकांत ४,२४,६२९ रु. ॲप्रोप्रिएशन अकाऊंट खातीं घेण्यांत आले आहेत. त्यांपैकी २,१०,००० रु. करासाठी राखून ठेवून शेअर्सवर ७½% करमाफ डिव्हिडंड देण्यांत आलें व १,१८,६०६ रु. शिलकी नफा पुढील वर्षांत ओढण्यांत आला. कंपनीचें वसूल भांडवल २० लक्ष रु. असून तिचे वेगवेगळे रिझर्व्ह फंड ७५,७९,५९८ रुपयांचे आहेत. म्हणजे एकूण फंडांची रकम ९५,७९,५९८ रु. होते. न मागविलेल्या भांडवलाची रकम ८० लक्ष रुपये आहे. ह्या आकड्यांवरून कंपनीच्या भक्कमपणाची कल्पना येईल. सर होमी मेथा हे कंपनीचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

---


### गोवर्धन डेअरी फार्म्स लि., पुणें

वरील कंपनीनें ३१ ऑगस्ट, १९४७ अखेर संपलेल्या वर्षी २६,८९८ रुपयांचें दूध वगैरे विकून ४,५६६ रु. निवळ नफा मिळविला. त्यांतून ९२० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून बाकीच्या नफ्याचा विनियोग क्यु. प्रे. भागांस ३१-८-४७ अखेर ६% व ऑर्डिनरी भागांस ४% डिव्हिडंड देण्याकडे केला जाईल. कंपनीनें गोवर्धन संस्थेकडून १० एकर जमीन विकत घेतली आहे. तिचेमुळें कंपनीच्या भक्कमपणांत भर पडली आहे. सरदार के. आर. विंचूरकर, बी. ए., एलएल. बी., हे कंपनीच्या डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन असून सर्स सोलापूरकर अँड डोणवाड कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.





पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.


१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी

★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★

९६ नारायण पेठ, पुणें २.



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या!

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश-
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त-

## दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.

| | रुपये |
|---|---|
| आलेलें काम : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठी व विम्यासाठी चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

## विजय टेक्स्टाइल्स लि.

-येरंडवणा, पुणें ४-

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागादारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.

## आरको

प्रत्येकास लागणारी नित्योपयोगी वस्तू
आरको निलगिरी तेल
लक्ष्मी एजन्सी, मुंबई २४










हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.